# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
Date – 11 June 2025
Time 18.10 to 18.20
Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**
**प्रादेशिक बातम्या**
**दिनांक – ११ जून २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- अत्याधुनिक पायाभूत सुविधा निर्मितीत भारताने घेतलेली झेप ही शाश्वतता आणि दूरदृष्टी या वैशिष्ट्यांनी प्रेरित असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन
- इटालियन कंपन्यांसाठी “होम अवे फ्रॉम होम” या संकल्पनेवर आधारित समर्पित औद्योगिक वसाहती विकसित करण्याचा सरकारचा निर्णय
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांना ‘कर्नल कमांडंट’ ही मानद पदवी प्रदान

आणि

- लग्न जुळवून देण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक करणाऱ्या टोळीला बीड जिल्ह्यात अटक

****

अत्याधुनिक पायाभूत सुविधा निर्मितीत भारताने घेतलेली झेप ही शाश्वतता आणि दूरदृष्टी या वैशिष्ट्यांनी प्रेरित असल्याचं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पायाभूत सुविधांमधल्या क्रांतीची अकरा वर्षे असं पंतप्रधानांनी समाज माध्यमावरच्या आपल्या संदेशात नमूद केलं आहे. **

दरम्यान, पायाभूत सुविधांमध्ये केंद्र सरकारने केलेल्या क्रांतीमुळे भारताचं नवनिर्माण झाल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात शहा यांनी, या सुविधांमुळे व्यापार आणि आर्थिक व्यवहार पूर्वीपेक्षा कितीतरी अधिक वेगवान झाल्याकडे लक्ष वेधलं आहे.

****

सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांनी प्रेरित होऊन भारताने गेल्या दशकात उल्लेखनीय परिवर्तन अनुभवलं आहे. यामध्ये वाहतुकीशी संबंधित पायाभूत सुविधांमधल्या परिवर्तनाचा आढावा घेणारा हा वृत्तांत –

***गेल्या दहा वर्षात महामार्ग बांधण्याचं प्रमाण सरासरी ३४ किलोमीटर प्रतिदिन इतकं वाढलं असून ते २०१४च्या प्रमाणाच्या तिप्पट आहे. भारतमाला योजनेंतर्गत आर्थिक कॉरिडोर विकसित करण्यासाठी २० हजार किलोमीटरहून अधिक लांबीचे महामार्ग बांधण्यात आले आहेत. २०१४ पासून प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ७ लाख ८० हजार किलोमीटरहून अधिक रस्ते बांधण्यात आले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागाशी संपर्क जवळपास ९९ टक्के इतका वाढला आहे. पीएम गतिशक्ती योजनेद्वारे पायाभूत सुविधांच्या एकत्रित विकासासाठी ४४ मंत्रालयं आणि ३६ राज्यं तसंच केंद्रशासित प्रदेशांना जीआयएस आधारित डिजिटल माध्यमातून जोडण्यात आलं आहे.***

***४५ हजार किलोमीटरहून अधिक रेल्वे मार्गांचं विद्युतीकरण, ३३३ जिल्ह्यांना जोडणाऱ्या ६८ वंदे भारत रेल्वे गाड्या, अमृत भारत स्टेशन योजनेंतर्गत तेराशेहून अधिक रेल्वे स्थानकांचं आधुनिकीकरण गेल्या दशकभरात झालं आहे. मेट्रो रेल्वेचं जाळं आता २३ शहरांमध्ये विस्तारलं आहे. उडान–उडे देश का आम नागरिक या योजनेत विमान वाहतूक क्षेत्रात ८८ विमानतळं सक्रिय झाली आहेत. सागरमाला योजनेच्या माध्यमातून बंदरांशी संबंधित २७७ प्रकल्प पूर्ण झाले आहेत. स्टॅच्यू ऑफ युनिटी, जगातला सर्वाधिक उंचीवरचा चिनाब रेल्वे पूल, आणि जगातला सर्वाधिक लांबीचा अटल भुयारी मार्ग हे भारताच्या अभियांत्रिकी चमत्कारांचे प्रतीक म्हणून आज उभे आहेत.***

****

दरम्यान, केंद्रीय मंत्रिमंडळाने आज रेल्वेच्या सहा हजार चारशे कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या दोन रेल्वे योजनांना मंजुरी दिली.

****

केंद्र सरकारने मागील अकरा वर्षात विकसित भारताचे भविष्य डोळ्यासमोर ठेवून नागरिकांना आत्मनिर्भर बनवण्यासाठी तंत्रज्ञानाच्या सहाय्याने विकासाला गती देण्याचे काम केलं, असं तुळजापूरचे आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी म्हटलं आहे. ते आज धाराशिव इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. गेल्या ११ वर्षांत धाराशिव जिल्ह्यात झालेल्या विकास कामांचा आढावा घेत, सध्या सुरू असलेल्या अनेक योजनांची पाटील यांनी माहिती दिली.

****

माजी आमदार श्रीकांत जोशी यांनी केंद्र सरकारच्या गेल्या ११ वर्षांच्या कामकाजाचा आढावा या शब्दांत मांडला.

**बाईट – श्रीकांत जोशी, माजी आमदार**

****

भारत सरकार इटालियन कंपन्यांसाठी “होम अवे फ्रॉम होम” या संकल्पनेवर आधारित समर्पित औद्योगिक वसाहती विकसित करणार आहे. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी इटली दौऱ्यादरम्यान ही माहिती दिली. राज्यात या वसाहतींसाठी मुंबईजवळील दिघी आणि छत्रपती संभाजीनगर इथल्या ऑरिक सिटीची निवड करण्यात आली आहे. याबाबत अधिक माहिती देणारा हा वृत्तांत –

***या वसाहतीत फक्त उद्योग व्यवसायच नव्हे तर इटालियन अभ्यासक्रमावर आधारित शाळा तसंच महाविद्यालयं, इटलीतील आरोग्य विमा योजनांना स्वीकारणारी हॉस्पिटल्स, तसंच एकत्रितपणे काम आणि निवास सुविधांचा समावेश असेल. ही औद्योगिक वसाहत संपूर्ण मराठवाड्याचं औद्योगिक, सामाजिक आणि आर्थिक परिवर्तन घडवणारी ठरेल तसंच नव्या गुंतवणुकीमुळे स्थानिकांना रोजगाराच्या संधी मिळतील, पायाभूत सुविधा उभारल्या जातील, आणि युरोपियन देशांसोबत औद्योगिक संबंध अधिक मजबूत होतील, असा विश्वास वर्तवला जात आहे.***

****

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांना आज 'कर्नल कमांडंट' या मानद पदवीने सन्मानित करण्यात आलं. केंद्रीय संरक्षण मंत्रालय अंतर्गत राष्ट्रीय छात्र सेना-एनसीसीच्या वतीनं घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात एनसीसीचे छत्रपती संभाजीनगरचे ग्रुप कमांडर ब्रिगेडियर ए.जी.बारबरे यांनी डॉ. फुलारी यांना 'कर्नल कमांडंट' ही पदवी आणि बॅटन, तसंच महासंचालक लेप्टनंट जनरल गुरबिरपाल सिंग यांचं या संदर्भातलं पत्र सन्मानपूर्वक प्रदान केलं. कुलगुरु फुलारी यांनी एनसीसीसाठी दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना ही मानद पदवी देण्यात आली आहे. कुलगुरु फुलारी यांनी या सन्मानाला उत्तर देतांना, हा विद्यापीठाचा बहुमान असून, हा सन्मान आपण विद्यापीठाला समर्पित करत असल्याची भावना व्यक्त केली.

****

येत्या २१ जून रोजी ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय योग संस्थानचे छत्रपती संभाजीनगर इथले गटप्रमुख सुरेश शेळके यांनी दिलेली वृक्षासनाबाबतची माहिती आज आपण जाणून घेऊया.

**बाईट – सुरेश शेळके, योगशिक्षक**

****

लग्न जुळवून देण्याच्या नावाखाली आर्थिक फसवणूक करणाऱ्या सात जणांच्या टोळीला बीड जिल्ह्यात अटक करण्यात आली. आष्टी तालुक्यातल्या कारखेल बुद्रुक गावात एका तरुणाचं लग्न जुळवण्यासाठी काही लोकांनी पावणे सहा लाख रुपये घेतले होते. मात्र लग्नानंतर नववधू नांदायला न आल्याने, आपली फसवणूक झाल्याचं संबंधितांच्या लक्षात आलं. वडवणी इथल्या एका ऊसतोड कामगार तरुणाकडूनही या टोळीने लग्न जुळवण्यासाठी तीन लाख रुपये घेतले होते. मात्र लग्नानंतर दोनच दिवसात नववधू पसार झाली. या प्रकरणी तपासादरम्यान टोळी पोलिसांच्या हाती लागल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीनं आज छत्रपती संभाजीनगर इथं शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. सरकारने शेतकऱ्यांना दिलेल्या आश्वासनांच्या पूर्ततेसंदर्भात विधान परिषदेले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पत्रकार परिषद घेत, सरकारवर टीका केली. या प्रकरणी

मराठवाड्यातील सत्ताधारी आमदार तसंच मंत्र्यांना निवेदन दिल्याचं दानवे यांनी सांगितलं.

✻✻✻✻

नांदेड जिल्ह्यात वादळी वारे आणि पावसामुळे झालेल्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्याच्या सूचना नांदेडचे पालकमंत्री अतुल सावे यांनी दिल्या आहेत. यासंदर्भात शासनस्तरावर निर्णय घेऊन नुकसानग्रस्तांना त्वरीत मदत केली जाईल, असं सावे यांनी सांगितलं.

✻✻✻✻

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील पैठणच्या पर्यटन विकासासाठी पायाभूत सुविधा तयार कराव्यात तसेच या आराखड्यातील कामं स्वदेश दर्शन योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यात यावेत, असे निर्देश पर्यटनमंत्री शंभूराज देसाई यांनी दिले आहेत. ते आज मुंबईत मंत्रालयात पैठण विकास आराखड्याबाबतच्या बैठकीत बोलत होते.

✻✻✻✻

लातूर शहरातील बहुतांश सीबीएसई माध्यमांच्या तसेच राज्य शिक्षण मंडळाच्या इंग्रजी माध्यमांच्या शाळा आजपासून सुरू झाल्या. शाळेच्या पहिल्या दिवशी फुगे लावून तसंच गुलाबाचं फुल देऊन चिमुकल्या विद्यार्थ्यांचं स्वागत करण्यात आल्याचं, आमच्या वार्ताहरानी कळवलं आहे.

✻✻✻✻

हवामान

मराठवाड्यातल्या बहुतांश भागात येत्या चौदा तारखेपर्यंत वादळी वारे आणि मेघगर्जनेसह हलका पाऊस होण्याची शक्यता आहे. राज्यात पंधरा जून नंतरच मोसमी पाऊस पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरण्या करण्याची घाई करू नये, असं आवाहन राज्याच्या कृषी विभागाने केलं आहे.

✻✻✻✻